# प्रेस नोट

कुरार पोलीस ठाणे, मुंबई
दिनांक –२८/०७/२०२२

## प्रेयसीचा खुन करणा–या आरोपीतास अवघ्या १२ तासात कुरार पोलीस ठाणेकडून अटक.

कुरार पोलीस ठाणेस दिनांक २८/०७/२०२२ रोजी ००:३० वा.च्या सुमारास फिर्यादी श्री. सुरेशकुमार रामलाल गौतम, वय ३८ वर्षे, राठि– आनंद चाळ, गोकुळनगर, कांदिवली पु. मुंबई यांनी पोलीस ठाणेस माहिती दिली कि, ते कामावरुन घरी आले असताना त्यांची मावसबहिण नामे कु. मनिषा पृथ्वीपाल जयस्वार, वय २७ वर्षे ही त्यांना राहते घरात गळा चिरलेल्या अवस्थेत रक्तबंबाळ स्थितीत आढळुन आली आहे. तात्काळ सदर ठिकाणी पोलीस ठाणेतील कर्तव्यावरील पोलीस अधिकारी व पथक असे पोहचुन पाहणी केली असता यातील बळित कु. मनिषा पृथ्वीपाल जयस्वार, वय २७ वर्ष ही घरामध्ये रक्तबंबाळ अवस्थेत पडलेली आढळुन आली. सदर मयत महिलेचा गळा कोणत्यातरी धारदार हत्याराने चिरलेला दिसुन आला तसेच तीचे डोक्यावरही दोन ठिकाणी मोठया जखमा आढळुन आल्या. सदर मयत महिलेचा मृत्यु हा खुन असल्याची खात्री पटल्याने फिर्यादी यांचे तक्रारी वरुन गु.र.क्रं. ७५०/२२ कलम ३०२ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर तात्काळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सतिश गाढवे, कुरार पोलीस ठाणे यांनी गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन रात्रपाळी पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे तसेच दोन्ही गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना घटनास्थळावरुनच गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या. यातील अनोळखी आरोपीताने घटनास्थळावर कोणताही दुवा सोडला नसल्याने सदरचा गुन्हा हा कोणत्या उद्देशाने करण्यात आला याबाबत काहीही ठोस माहिती मिळुन येत नव्हती. घटनास्थळाचे आजुबाजुस राहणा–या शेजा–यांकडुनही मयत महिलेबाबत काहीही ठोस अशी माहिती मिळुन आली नाही. मा. वरिष्ठांच्या सुचनांप्रमाणे तात्काळ कुरार पोलीस ठाणेसह परिमंडळातील इतर तीन पोलीस ठाणेतील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांची विविध पथके तयार करुन इतर तपासासोबत तांत्रिक तपासासही सुरुवात करण्यात आली.

तांत्रिक तपासादरम्यान यातील संशयित आरोपी नामे अखिलेशकुमार प्यारेलाल गौतम याचा यातील मयत महिलेसोबत मैत्रीपुर्वक संबध असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर संशयिताबाबत तांत्रिक तपासाव्यतिरिक्त काहीही माहिती प्राप्त नसताना उपलब्ध तुटपुंजा माहितीवरुन त्याचा शोध घेवुन त्यास मानखुर्द रेल्वे स्थानक परिसरातुन तपासकामी ताब्यात घेण्यात आले. त्याचवेळेस सदर महिलेल्या अजुन काही संपर्कात असलेल्या व्यक्तिंची माहिती मिळुन आल्याने त्यांनाही तपासकामी ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेल्या सर्व संशयितांकडे स्वतंत्रपणे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासात आरोपी नामे अखिलेशकुमार प्यारेलाल गौतम, वय २४ वर्षे याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. यातील आरोपी अखिलेशकुमार प्यारेलाल गौतम व मयत महिलेचे मागील काही वर्षापासुन प्रेमसंबध होते व नजीकच्या काळात त्यांचे लग्न होणार होते परंतु यातील मयत महिलेचे इतर परपुरुषाशी अनैतिक संबध असल्याची माहिती प्राप्त झाल्याने आरोपीताने मयत महिलेच्या घरात जावुन तीचा चाकुने अत्यंत निर्दयपणे गळा कापुन खुन केला.

सदरची कारवाई मा. डॉ.महेश पाटील, सो अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग मुंबई, (अतिरिक्त कार्यभार ), मा. पोलीस उप–आयुक्त, परीमंडळ– १२ श्री. सोमनाथ घार्गे, मा. सपोआ समतानगर विभाग राजेंद्र मोहिते, कुरार पोलीस ठाणेचे वपोनि श्री. सतिश गाढवे, पोनि राजेंद्र पन्हाळे यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि वानखेडे, पोउपनिरी खरडे, सपोनि घार्गे, सपोनि थोरात, पोउपनिरी वाळुंजकर, पोह मोरे, पोना भोगले, पोशि जाधव, मांडवे, तिजारे, हवाळे, तांबोळी, तांबे, वेदांते, साळवी, पो.ना.सागर पवार यांनी वायुवेगाने नमुद गुन्हयाचा तपास करून सदरचा खुनासारखा गंभीर गुन्हा अवघ्या १२ तासात उघडकीस आणलेला आहे.